# ग्रामस्तरीय पाण्याची सुरक्षितता व शाश्वतता






unicef
unite for children

## पिण्याच्या पाण्याची सुरक्षितता व शाश्वतता


- पाणी म्हणजे जीवन ! त्यामूळे मानवी जीवनात पाण्याएवढे महत्व दुसऱ्या कशाला नाही.
- वाढत्या लोकसंख्येमुळे आणि औद्योगिकरणामूळे पाण्याचा प्रश्न गंभीर झाला आहे.
- १०० वर्षांपूर्वी जेवढे पाणी उपलब्ध होते आजही तेवढेच उपलब्ध आहे.
- परंतु पाण्याची दरडोई उपलब्धता कमी झाली आहे.
- किमान पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी सुटावा यासाठी उपाययोजना चालू आहेत.
- हा प्रश्न सुटावा यासाठी लोकसहभागाची व पाण्याच्या योग्य उपयोगाविषयी जागृती व त्यानुसार वागणे व अंमल करणे अत्यंत आवश्यक आहे.
- पाणी किंवा जलव्यवस्थापनासाठी गाव हा केंद्रबिंदू असणे गरजेचे आहे.






## ग्रामस्तरीय पाण्याची शाश्वतता आणि सुरक्षितता


- गावपातळीवर शाश्वतता आणि सुरक्षितता या दोन्ही गोष्टी महत्वाच्या आहेत.
- सर्वप्रथम आपण शाश्वतता म्हणजे काय? हे समजून घेऊ.
- पाण्याचा मुख्य स्त्रोत हा - पाऊस.
- पाऊस ठराविक काळासाठी पडतो का? "हो" मग, पाणी कोठून मिळणार?
- पावसानंतर दुसरे पाणी मिळण्याचे माध्यम-नदी, नाले, झरा, तलाव (जमिनिवरचे), विहिर, हातपंप, विंधन विहिर (भूजल).
- जर हे सर्व संपले तर? तर मग? 'बोंबाबोंब' भांडण, पाण्याचा व्यापार, गैरवापर इत्यादी.
- यासाठी पाणी टिकवून ठेवणे, पाण्याचा पुरेसा साठा ठेवणे, याला महत्व आहे.
- पाणी उपलब्ध आहे पण साधन नाही म्हणजे पाणी पुरवठा योजना देखरेखे अभावी बंद आहे! आता काय करणार?
- पाणी नेहमीच उपलब्ध राहणे म्हणजेच पाण्याची शाश्वतता आणि यासाठी आवश्यक आहे ते म्हणजे जलस्त्रोतांची काळजी व पाणी पुरवठा योजनांचे योग्य संचलन.






## पाण्याची सुरक्षितता


- पाणी सुरक्षित असणे म्हणजे काय?
- पाण्याला गुणधर्म असतात- भौतिक (वव, रंग इ.) आणि रासायनिक (लोह, खारेपण, फ्लोराईड, क्लोराईड, नायट्रेट) आहेत.
- पिण्याच्या पाण्यासाठी याची मानके राष्ट्रीय व आंतराष्ट्रीय स्तरावर ठरलेली आहे.
- यांच्यासोबतच पाण्याचा जैविक गुणधर्म म्हणजे-जंतु विरहीत पाणी.
- पाण्याच्या गुणधर्मांची मानके निश्चित असल्याने त्यापलीकडे बदललेले गुणधर्म मानवी जीवनास घातक ठरतात.
- जैविक गुणधर्मांचा-दुषित पाण्याचा प्रभाव तात्काळ जाणवतो.
- भौतिक व रासायनिक दृष्टया दूषित पाणी कालांतराने प्रभाव दाखवतो.
- जैविक, भौतिक आणि रासायनिक गुणधर्म ठरवून दिलेल्या अथवा निश्चित केलेल्या प्रमाणात असल्यास व ज्यामूळे मानवी जीवनास धोका नसल्यास पाणी सुरक्षित आहे असे म्हणता येईल.
- पाणी सुरक्षित राहण्यासाठी पाण्याची काळजी स्त्रोतापासून ते पाणी पिण्यापर्यंत करणे गरजेचे आहे.




शुद्ध पाणी
निरोगी परिवार


- गावपातळीवर <u>जल/पाणी</u> व्यवस्थापन करणे हे काम सोपे नसले तरी ते अवघड नाही.
- आपल्या देशात जलव्यवस्थापनासाठी फार चांगल्या योजनां संकल्परुपात मांडल्या आहेत.
- राळेगण सिध्दी आणि हिवरेबाजार या गावांनी जलव्यवस्थापनाचा उत्कृष्ट प्रयत्न आपल्या ला दाखविला आहे.
- आपण थोडे प्रयत्न केल्यास हि प्रक्रिया अत्यंत सोप्या पध्दतीने लक्षात येईल.
- यासाठी खालील बाबी समजणे गरजेचे आहे.
    - लोकसहभाग + प्रेरणा+ तांत्रिक सहाय्य.
    - व्यवस्थापन व नियोजन – जल उपलब्धता, पीक, पाणी पुरवठा योजना.
    - स्वच्छता आणि संनियंत्रण.
    - पाण्याची सुरक्षितता व शाश्वतता.




जल उपलब्धता, व्यवस्थापन, पीक नियोजन
लोकसहभाग + प्रेरणा + तांत्रिक सहाय्य
पाणी पुरवठा योजना व्यवस्थापन आर्थिक, तांत्रिक, संस्थात्मक
पाण्याची शाश्वतता व सुरक्षितता
पाणी गुणवत्ता संनियंत्रण, वैयक्तिक व परिसर स्वच्छता

## ग्रामस्तरीय पाणी शाश्वतता व सुरक्षितता

- या प्रक्रियेसाठी आपल्याला कोण मदत करेल?
- जिल्हा परिषद पातळीवर पाणी पुरवठा विभाग, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा स्वच्छता शाखा आणि कृषी विभाग.
- तालुका पातळीवर तालुका कृषी अधिकारी, पाणी पुरवठा अभियंता, गट संसाधन केंद्र.
- आपला यात काय सहभाग असेल?
- गावपातळीवर खालील घटकांचा सहभाग अत्यंत महत्वाचा आहे.
  - ग्रामपंचायत.
  - ग्रामसभा.
  - ग्राम पोषण, आहार, पर्यावरण, पाणी पुरवठा व स्वच्छता समिती.
  - महिला व पुरूष बचत गट.
  - युवक तरूण मंडळ.
  - सेवाभावी संस्था.
  - होतकरू महिला व पुरूष.




पाणी प्रयोगशाळा
कृषि विभाग
पाणी पुरवठा विभाग
स्वच्छता शाखा


## गावस्तरावरील प्रक्रिया

१. गावात माहिती देणे - माहिती शिक्षण व संवाद कार्यक्रम.
२. गृहभेटी, ग्रामसभा आयोजित करणे.
३. सर्वेक्षण करणे- पाणी पुरवठा योजनांचे, स्वच्छतेचे,जलस्त्रोतांचे.
४. गावफेरी व माहिती गोळा करणे (मुलभूत व आवश्यक).
५. गावाचा नकाशा तयार करणे.
६. प्रात्यक्षिक प्रशिक्षण आयोजित करणे-गंवडी प्रशिक्षण, समिती प्रशिक्षण, पाणी गुणवत्ता तपासणी.
७. विविध घटकांसोबत चर्चा करणे -महिला मंडळ, युवक- युवती मंडळ, शेतकरी समिती.
८. कृती आराखडा - जलव्यवस्थापन आराखडा तयार करणे.
९. लोकवर्गणी व लोकसहमती.
१०. अंमलबजावणी करणे.
११. देखरेख व संचालन.

## गावात माहिती देणे

- जलव्यवस्थापनाबद्दल चर्चा.
- पाणी पुरवठा व स्वच्छता योजनेबददल माहिती.
- निर्मल ग्राम पुरस्काराबद्दल - स्वच्छ गावाबद्दल माहिती.
- कलापथकांचा उपयोग , कळपुतळयांचा उपयोग.





## ग्रामसभा आयोजित करणे


- लोकांना ग्रामसभेचे अधिकार समजावून सांगणे.
- ग्रामसभेची भूमिका आणि कर्तव्ये सांगणे.
- ग्रामसभा कशी हाताळावी हे सांगणे.
- ग्रामसभेतील विषय सांगणे + अपेक्षा सांगणे.
- योजनांबद्दल माहिती सांगणे.





ग्राम पंचायत

## सर्वेक्षण + गावफेरी + माहिती गोळा करणे

- मुलभूत माहिती गोळा गरणे.
- सर्वेक्षण करणे.
- गावफेरी व विविध स्थळांना भेटी देणे.
- या सर्व बाबी करत असताना गावातील लोकांचे म्हणणे जास्त ऐकून घेणे.
- आपल्या ज्ञानाचा या वेळेस कमी उपयोग करणे.
- माहिती गोळा करताना नम्रता आणि परिपक्वता दाखविणे अत्यंत महत्वाचे आहे.





## गाव नकाशा तयार करणे

- नकाशा तयार करताना मार्गदर्शकाची भुमिका बजावणे.
- लोकांमध्ये चर्चा घडवून आणणे.
- मिळालेली माहिती दाखविल्यानंतर त्याची शहानिशा करणे- खात्री करणे.
- आवश्यक माहितीवर अधिक भर देणे.
- नकाशा स्वत: न काढता गावातील व्यक्तीला काढू देणे.
- जास्त बोलू नये.
- कृषिविषयक, पाण्याविषयी आणि स्वच्छतेविषयी व उपलब्ध सुविधांविषयी माहिती घेणे.
- आवश्यकता असल्यास त्याची वेगळी नोंद करणे.






## प्रात्यक्षिक व प्रशिक्षण आयोजित करणे

- गवंडी प्रशिक्षण.
- पाणी गुणवत्ता तपासणी.
- विविध विषय जसे कृषी, पाणी व स्वच्छता यांचे प्रशिक्षण आयोजित करणे.



## गवंडी प्रशिक्षण



## पाणी तपासणी



## देखभाल व दुरुस्ती





## देखभाल व दुरुस्ती



## विविध घटकांसोबत चर्चा आणि कृती आराखडा

- महिला बचत गट, युवक-युवती मंडळ, शेतकरी वर्ग, विविध समित्या यांच्यासमवेत चर्चा करणे.
- सर्व घटकांच्या गरजा, त्यांच्या आवश्यकता समजून घेणे.
- कृती आराखडा बनविताना योजना, विविध उपाय, तांत्रिक माहिती याचा उपयोग करणे.
- सोबत सर्व प्रकारची संदर्भ माहिती तयार ठेवणे.
- वस्तुंच्या बाजारकिमतीची, योजनांच्या ढोबळ किमतीची इतर माहिती जवळ ठेवणे आवश्यक आहे.






गाव कृति आराखडा
जल व्यवस्थापन
एकूण उपलब्ध पाणी ..........................
एकूण लागणारे पाणी ..........................
पाणी पुरवठा
एकूण लोकसंख्या ..........................
पिण्यासाठीचे पाणी ..........................
कृषी व अन्य उपयोग
प्रशिक्षण खर्च ..........................
साहित्य खरेदी ..........................
एकूण वसुली
वार्षिक खर्च ..........................
एकूण बचत ..........................
ग्राम पंचायत
ग्रामपंचायत

## गावपातळीवर जलव्यवस्थापन कृती आराखडा प्रारूप

- यामध्ये गावात जलव्यवस्थापनाबाबत काय समस्या आहेत हे नमूद करणे.
- यासाठी काय उपाययोजना आहेत, तांत्रिक मदत लागेल का? कोणाची?
- उपाययोजना कोण आणि कधी करणार?
- यासाठी लागणारा खर्च किती? तो कसा जमवणार?
- यावर कोण देखरेख करणार?
- साहित्य कोठून आणणार?
- वरिल सर्व बाबीचा तपशील नमूद करावा.




# गावपातळीवर जलव्यवस्थापन

## कृती आराखडा प्रारूप

| समस्या | उपाययोजना | कोण करणार | कधी करणार | एकुण खर्च रु. | संसाधन जुळवाजुळव | संनियंत्रणाची जबाबदारी |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

## पाणी पुरवठा सुविधेच्या संचालन, देखभाल व दुरूस्ती

- कृती आराखडा प्रारूप.
- योजनेमध्ये तीन पध्दतीचे व्यवस्थापन अपेक्षित आहे.
    - तांत्रिक.
    - आर्थिक.
    - संस्थात्मक.
- संबंधीत व्यवस्थापनामधल्या काय समस्या आहेत/असू शकतात हे ठरविणे.
- यासाठी कशाप्रकारच्या उपाययोजना लागतील हे समजून घेणे.
- कोण करणार आणि कधी करावी लागणार हे ठरविणे.
- अपेक्षित खर्च आणि त्याची जुळवाजुळव हे सुध्दा निश्चित करणे आवश्यक आहे.



# पाणीपुरवठा सुविधांचे संचालन, देखभाल व दुरूस्ती


## कृती आराखडा प्रारूप

गावाचे नाव-　　　　तालुका-　　　　जिल्हा-

| क्र.सं. | समस्या | करावी लागणारी उपाययोजना | कोण करणार | कधी करणार (कालावधी) | संसाधनाची जुळवाजुळव | संनियंत्रणाची जबाबदारी कोणाची? | अंदाजित खर्च रूपये |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | तांत्रिक व्यवस्थापन | | | | | | |
| | | | | | | | |
| | आर्थिक व्यवस्थापन | | | | | | |
| | | | | | | | |
| | संस्थात्मक रचना | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |

## पाणी गुणवत्ता आणि स्वच्छता संनियंत्रण कृती आराखडा प्रारूप

- पाणी गुणवत्तेसंबंधी आवश्यक कार्यवाही जसे पाणी गुणवत्ता तपासणे.
- स्वच्छताविषयक सर्वेक्षण करणे.
- वैयक्तिक व सार्वजनिक पातळीवर स्वच्छता निरीक्षण करणे.
- शाळा व अंगणवाडीमध्ये शुध्द पाणी पुरवठा होतो की नाही याची काळजी घेणे.
- घरगुती पातळीवर पाणी हाताळण्यासंदर्भात वारंवार माहिती देणे.
- गावात साथरोग आल्यास काय करावयास पाहिजे हे निश्चित करणें.



# पाणी गुणवत्ता आणि स्वच्छता संनियंत्रण

## कृती आराखडा प्रारूप

गावाचे नाव- तालुका- जिल्हा-

| विषय | समस्या | करावी लागणारी उपाययोजना | कोण करणार | कधी करणार (कालावधी) | संसाधनाची जुळवाजुळव | संनियंत्रणाची जबाबदारी कोणाची? | अंदाजित खर्च रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | पाणी गुणवत्ता संनियंत्रण | | | | | | |
| | पाणी तपासणी | | | | | | |
| | वैयक्तिक आणि परिसर स्वच्छता | | | | | | |
| | शालेय पाणीपुरवठा आणि स्वच्छता | | | | | | |
| | इतर | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |

## लोकवर्गणी व लोकसहमती / सहभाग

- कृती आराखड्याची एकूण किंमत किती? याची माहिती देणे.
- यासाठी किती लोकवर्गणी लागेल हे सांगणे.
- लोकवर्गणी कशाप्रकारे जमा करता येईल हे सांगणे.
- यामध्ये नगदी, श्रम अथवा वस्तू याबद्दल सांगणे.
- लोकवर्गणीचे व लोकसहभागाचे फायदे सांगणे.





## अंमलबजावणी

- अंमलबजावणी करतेवेळेस गावस्तरीय समित्यांची नियमित बैठक आयोजित करणे.
- तालुका पातळीहून देखरेख करणे.
- साहित्य खरेदी व इतर खर्चाचा हिशोब ठेवणे व तो सार्वजनिक ठिकाणी जाहिर करणे.
- साहित्याची गुणवत्ता खात्री करणे.
- कामकाजावर समितीमार्फत देखरेख यावर भर देणे.
- आवश्यकता असल्यास कृती आराखड्यात बदल संभावित असल्यास ग्रामसभा घेणे.
- अंमलबजावणी हि वेळेत आणि ठरविलेप्रमाणे कृती होत आहे याची काळजी घेणे.









महेश बांधकाम साहित्य भांडार



## देखरेख व संचालन


- कुटूंबाकडून दरमहा पाणीपट्टी वसूली.
- तुटफूट असल्यास त्याची दुरुस्ती.
- स्त्रोतांची काळजी- कुंपन लावणे.
- हॅन्डपंप दुरुस्ती, पाईपलाईन दुरुस्ती.
- ब्लीचिंग पावडर टाकणे.
- पाणी गुणवत्ता तपासणे.
- इलेक्ट्रीक पंप व विद्युत उपकरणांची देखभाल करणे.
- मागील महिन्याच्या हिशोब समित्यांच्या/ ग्रामपंचायतीच्या बैठकीत सादर करणे.
- पाणी कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण करणे इत्यादी.





## पाणी शाश्वतता व सुरक्षितता याबाबत महत्वाच्या बाबी.

- पाणी शाश्वतता म्हणजे - सर्वांना नियमितपणे मुबलक पाणी उपलब्ध असणे.
- पाणी सुरक्षितता म्हणजे - आरोग्याच्या दृष्टीने पाण्याची गुणवत्ता योग्य असणे.
- जलव्यवस्थापन म्हणजे - पिण्यासाठी, शेतीसाठी, उद्योगधंद्यासाठी पाण्याचे नियोजन करणे.
- पाणी पुरवठा योजनेचे नियमित संचालन व देखरेख करणे.
- गाव पातळीवर पाण्याचा योग्य वापर, पाणी हाताळणी याबाबत जाणीव जागृती करणे.
- योजना बंद न पडू देता तात्काळ उपाययोजना करणे.
- पाण्याची गुणवत्ता नियमित तपासणे.
- पाणी पुरवठा कर्मचारी यांचे प्रशिक्षण आयोजित करणे.
- पाण्याच्या स्त्रोतांचे संरक्षण करणे.
- पाणी पट्टी नियमित भरणे.
- लोकसहभाग निश्चित करणे- समस्या/अडचणी आल्यास सामोपचाराने सोडविणे.




ग्राम पंचायत
शुद्ध पाणी निरोगी परिवार